पोवाडा

# नवी गोमाता–'संकर' देवाचा चमत्कार

विज्ञान शाहीर प्रभाकर जामखेडकर

●

हो धवल क्रांती देवता। नवी गोमाता। वंदावी आता।
दुधाची गंगा वाहू लागणार। दैन्य देशाचे हटणार।
'संकर' देवाचा पहा चमत्कार ।। धृ० ।।
शेती भारताचा आधार। गुरं आणि ढोरं। वाहती भार।
भारभूत देशाला झाली। गरिबीची काळीकुट्ट सावली।
समद्या लोकाला खाऊ लागली ।।
भारती गायी खंडीभर। दूध घोटभर। उपाशी पोर।
दुधाचा दुष्काळ जाळी सर्वास। सान थोर पारखे एका थेंबास।
गरिबीचा शाप भोवतो देशास ।।
हे दुष्ट चक्र गरिबीचं। गरीब शेतीचं। गरीब गायीचं।
शेतकरी गरीब, गरीब हा देश। जुन्या गाईचा बदलुया वेष।
नव्या गाईचा नवा उल्हास ।।

जरी दुधाळ वंश असती देशात।
लाल सिंधी, गीर, साहिवाल।
थारपाक, राठी ही त्यात।
देवणी, डांगी, गौळाऊ वंश महाराष्ट्रात।
फक्त दीड टन दूध सरासरी वेताला।।
डुऔ डुऔ गायीची वज नाही राखली।
गायीची कास पार आटली।
तोटयाची गाय ही दैन्य देई देशास ।।
अनुवांशिक पात्रता कमी देशी वंशात ।।
तिसऱ्या वर्षी वयात येतात।
चौथ्या वर्षी प्रथम वितात।
व्याल्यानंतर माजावर यायला।
तीन चार महिने तरी घेतात।
चारा दाणा जितका खातात।
त्याहून कमी दूध देतात।
भाकड जास्त राहतात।

(चाल)

कृषिप्रधान देश भारत। सहा लाख खेडी देशात ।।
सत्तर टक्के लोक शेतीत। काबाडकष्ट करून झिजतात ।।

२५ कोटी लोक देशात। गरिबीच्या रुतले चिखलात ।।
२८ कोटी गाईचं रान। भागत नाहीं दुधाची तहान ।।
साडेपाच कोटी टन दूध। येत्या दहा वर्षात लागणार ।।
अेवढं दूध नाही मिळणार। देश पुष्ट कसा होणार ? ।।
देशी गाय कमी पडणार। नवी गाय हाच उपचार ।।

(चाल)

परदेशीं वंश विख्यात। दूध देण्यात
जर्सी, होल्स्टेन, फ्रिझियन, ब्राउन स्विस प्रख्यात।
दर वेती चार पाच टन दूध देतात।
उच्च उत्पादनशील गुण अनुवांशिक।
वांशिक। लाभ हा एक। 'संकर' करण्यास बीज हे चोख ।।
'संकर' देव करी चमत्कार। गाय घडणार।
परदेशी देशी वंशांची जोडी जमणार।
कृत्रिम गर्भधारणेनं 'संकर' त्यांचा करणार।
दुपटीनं 'मिश्र गाईचं' दूध वाढणार।
वाढणार। कास भरदार। नफ्याची धार वाहू लागणार ।।
ही झपाटयानं वाढणार, वयात येणार।
अडीच वर्षा अगोदर पहिलं वासरू देणार।
भाकडकाल तीन महिन्याहून कमी असणार।
खाण्याच्या मानानं दूध जादा देणार।
देणार। श्रेष्ठ ठरणार। दैन्य हरणार, देश तरणार।।
अन्नरूपांतर क्षमतेत। दूजं यंत्र नाही जगतात ।।

(चाल)

दूध दुभतं विपुल दे आता। वंदावी नवी गोमाता ।।
भूमीक्रांती होऊ दे आता। वंदावी नवी गोमाता ।।
प्रथिन क्रांती होऊ दे आता। वंदावी नवी गोमाता ।।
सामाजिक क्रांतीचा आत्मा। वंदावी नवी गोमाता ।।
ही साक्षात् लक्ष्मी देवता। वंदावी नवी गोमाता ।।
ही देशोद्धारक माता। वंदावी नवी गोमाता ।।
नवी गाय आत्मा क्रांतीचा। दूध निवासाचा ।।
समाज बदलाचा। क्रांतीचा पाया ठरणार ।।
गाईविण देश कसा जगणार। 'प्रभाकर' तिचे गुण गाणार।।